# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

## नगररचना विभाग

**महाराष्ट्र प्रादेशिक व न.र.अधिनियम १९६६ मधील कलम ५२ अ नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्याचे अनुषंगाने शासनातर्फे मंजूर शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१४/ प्र.क्र.८२/१४/नियम/नवि-१३ दि.०७/१०/२०१७ अन्वये प्राप्त प्रस्तावांच्या छाननीसाठी आवश्यक कागदपत्रे.**

१. विषयाधिन जागेतील बांधकाम हे दि.३१/१२/२०१५ पुर्वीचे असल्याबाबत पुरावा. जसे की मनपाकडील अनधिकृत बांधकाम केल्याची नोटीस / कर आकारणी केल्याचे पत्र/ कर आकारणी उतारा इत्यादी.

२. विषयांकीत जागेबाबतचा अद्ययावत प्रमाणित गटबुकाचा व फाळणीचा नकाशा (मुळ प्रतीत)

३. विषयांकीत जागेचे संबंधित स.नं.मध्ये निश्चित स्थान व त्यावरील बांधकाम दर्शविणारा उपअधिक्षक भूमि अभिलेख,भिवंडी यांनी प्रमाणित केलेला अद्ययावत मोजणी नकाशा (मुळ प्रतींत)

४. विषयांधिन बांधकामाखालील जागेबाबतचा नगर भूमापन कार्यालयाकडील प्रमाणित नकाशा व चौकशी रजिस्टरमधील उतारे मूळ प्रती असल्यास तसेच टी.डी.आर.ची कागदपत्रे सादर करावी.

५. विषयांकीत जागेचे संदर्भातील फ़ेरफारपत्रक/खरेदीखत/भाडेपट्टा/नोंदणीकृत कुलअखत्यारपत्र इ.सर्वचे संदर्भातील सर्व मूळ व सत्यप्रतीतील कागदपत्रे/नकाशे/माहिती.

६. विषयांकीत जागेबाबत/ बांधकामाबाबत कोणताही वाद,न्यायालयीन वाद चालु असल्यास त्याबाबतची संपूर्ण माहिती/कागदपत्रे/नकाशे मुळ प्रतीत/सत्य प्रतींत

७. विषयांकीत बांधकामाखालील जागा ही पूर्वीचे मंजूर अभिन्यांसापैकी किंवा पूर्वी बिनशेती झालेली असल्यास मंजूर अभिन्यांस नकाशाची व बिनशेती आदेशाची मूळ प्रत व प्रमाणित प्रत.तसेच नमुना नंबर २ ची प्रत.

८. संबंधित इंजिनिअर/आर्किटेक्ट यांचे अंमलात असलेल्या परवान्याची प्रमाणित सत्य प्रत.

९. विषयाधिन प्रस्तावासाठी स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचे नेमणुक पत्र.

१०. प्रचलित नियमानुसार तसेच शासन निदेशानुसार विद्यमान संपूर्ण बांधकामासह सविस्तररीत्या दर्शविणारे सर्व मूळमालक,मुखत्यारपत्रधारक व संबंधित आर्किटेक्ट/ इंजिनिअर स्ट्रक्चरल इंजिनिअर यांची स्वाक्षरी असलेले नकाशे मूळ प्रतिंत स्थळदर्शक नकाशासह.

११. प्रकरणी पूर्वीचे मंजूरीचे (असल्यास) अनुषंगाने महानगरपालिकेने आपणांस दिलेले सर्व कागदपत्रे/ नकाशे /पत्रव्यवहार ह्यांच्या प्रति सोबत सादर कराव्यात.

१२. कर भरल्याबाबत संबंधित प्रभाग समिती कार्यालयाकडील दाखला

१३. प्रस्तावित बांधकामाचा भार विद्यमान बांधकाम सहन करु शकेल याबाबतचे स्ट्रक्चरल इंजिनिअरचे प्रमाणपत्र मूळ प्रतिंत.(स्टॅबिलीटी सर्टिफिकेट) जोडावे अथवा विद्यमान इमारत कोसळण्याच्या अवस्थेत असल्यास ती ताबडतोब पाडून टाकावी. इमारत कोसळून जीवीतहानी व वित्तहानी झाल्यास त्याला महानगरपालिका जबाबदरा राहणार नाही.

१४. विषयांकीत जागा मंजूर नगररचना योजनेच्या क्षेत्रांत समाविष्ट असल्यास नगररचना योजनेची अनुषंगाने मालिकी हक्काबाबतची प्रमाणित कागदपत्रे व नकाशे व इत्यादी माहिती सादर करणे आवश्यक आहे व त्यासोबत बी फॉर्मदेखिल जोडणेत यावे.

२/...

१५. महानगरपालिकेने रस्त्यासाठी /अन्य कारणांसाठी जागा घेतलेली असल्यास त्याबाबतची संबंधित सर्व मूळ कागदपत्रे व नकाशे.

१६. मनपा परवानाधारक स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचा शासनाच्या विहीत नमुन्यातील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट.

१७. विषयाधिन बांधकामाखालील जागा ही ७/१२ उताऱ्यानुसार इनामवर्ग / वर्ग-२ अशी असल्यास शासनाच्या संबंधित विभागाकडील ना हरकत दाखला.

१८. विषयाधिन बांधकामाखालील जागा ही सरकारी असल्यास ७/१२ नुसार संबंधित सक्षम प्राधिकारी यांचा ना हरकत दाखला.

१९. विषयाधिन बांधकामाखालील जागा ही सरकारी असल्यास शासनाकडून सदर जमिन बांधकामधारकांना हस्तांतरीत केल्याचा दाखला.

२०. विषयाधिन विद्यमान इमारतीत उद्वाहन असल्यास विद्युत निरिक्षक (उद्वाहन), उद्वाहन निरीक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील उदवाहन चालविण्याचा परवाना

२१. महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचा ना- हरकत दाखला.

२२. महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व मल निःसारण विभागाचा ना- हरकत दाखला.

२३. महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचा ना- हरकत दाखला.

२४. आर्किटेक्ट / इंजिनिअर हयांना नियुक्त केल्याचे व त्यांनी प्रकल्प स्विकृत केल्याचे मान्यतापत्र

२५. मनपाच्या प्रभाग समिती कार्यालयाकडून सदर मिळकत धोकादायक असल्याची नोटीस दिलेली असल्यास तसेच पंचनामा व प्रमाणपत्र दिले असल्यास त्याच्या सत्यप्रति सादर कराव्यात.

**विशेष टिप** :- सदर अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी शासनातर्फे मंजूर उक्त नियमावलीचे अवलोकन करुन नियमावलीशी सुसंगत व महानगरपालिकेच्या परवानाधारक वास्तुविशारद / इंजिनिअर मार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव हे विहीत मुदतीत सादर करण्याची दक्षता घेण्यांत यावी.

(एस.सी.राठोड)

**सहाय्यक संचालक,नगररचना,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,**
**भिवंडी**